दि 20/10/2022

प्रजावाणी



# सीसीटीव्ही फुटेजवरून पोलिसांनी शोधली दुचाकीचोरांची टोळी!

## परभणीच्या तीन तरुणांना केली अटक

## वजिराबाद पोलिसांकडून ३० दुचाकी जप्त



नांदेड, दि.१९: वजीराबाद पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून दुचाकीचोरांची टोळी पकडली आहे. पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने परभणी येथे जाऊन तीन तरुणांना ताब्यात घेतल्यानंतर त्यांच्याकडून चोरीच्या ३० दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

गेल्या काही महिन्यांमध्ये दुचाकीचोरीच्या अनेक घटनांची नोंद पोलिस दप्तरी झाली. दुचाकी चोरांकडून होंडा युनिकॉन, होंडा शाईन व पॅशन प्रो अशा चांगल्या कंपनीच्या दुचाकीवर हात मारला जात होता. या दुचाकीचे लॉक चार ते पाच महिन्यांमध्ये खराब होत असल्यामुळे चोरट्यांनी याच कंपनीच्या गाड्यांना टार्गेट करून बनावट चावीचा वापर करीत हात साफ करण्याचे तंत्र अवलंबले असल्याची बाब पोलीस तपासात समोर आली आहे.

शहरातील दुचाकी चोरीच्या वाढत्या घटना लक्षात घेऊन पोलीस उपमहानिरीक्षक निसार तांबोळी, पोलीस अधीक्षक प्रमोद शेवाळे, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, निलेश मोरे जास्तीत जास्त गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना सर्व पोलिस ठाण्याच्या प्रमुखांना केल्या होत्या. त्यानुसार वजिराबाद पोलिस ठाण्याचे निरीक्षक जगदीश भंडरवार यांनी मागील दहा महिन्यांत ज्या-ज्या ठिकाणी दुचाकी चोरीचे गुन्हे घडले आहेत, तेथील परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून आरोपींचा शोध सुरू केला.

वजीराबाद ठाण्यातील गुन्हे शोध पथकातील पोलिस अधिकारी व अंमलदार यांना दिलेल्या सूचनेनुसार गुन्हे शोध पथकाचे प्रमुख व सहाय्यक पोलिस निरीक्षक संजय निलपत्रेवार, जमादार दत्तराम जाधव, गजानन किडे, विजयकुमार नंदे, शरदचंद्र चावरे, संतोष बेलूरोड, व्यंकट [illegible] अंकुश पवार यांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयित आरोपींचा शोध घेण्याची मोहीम सुरू केली.

### दुचाकीला लावा उच्चप्रतीचे लॉक

दिवाळी व इतर सणानिमित्त बरेच जण बाहेरगावी गेल्यानंतर आपली वाहने घरी ठेवलेली असतात. ही वाहने चोरीला जाऊ नये, याची सर्वांनी काळजी घेणे आवश्यक आहे. दुचाकीला कंपनीने दिलेल्या लॉकवर अवलंबून न राहता बाजारात उपलब्ध असलेल्या उच्चप्रतीच्या लॉकचा वापर करावा, असे आवाहन पोलिस अधीक्षक प्रमोद शेवाळे यांनी केले आहे. अशा लॉकचे एक छायाचित्रही पोलीस अधीक्षक कार्यालयाने जारी केले आहे.



या पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे दुचाकीचोर हे परभणी येथील असल्याचे कळाल्यानंतर हे पथक परभणीला रवाना झाले. परभणी येथे सहाय्यक पोलिस अधीक्षक अभिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक खदीर शेख व शिपाई निलेश कांबळे यांच्या मदतीने संशयित आरोपींचा शोध घेतला असता शेख अरबाज उर्फ कोब्रा शेख चांद (वय २४, रा. दर्गा रोड, पारवा गेट, परभणी), टेलर काम करणारा आरेज खान उर्फ आमेर अयुब खान (वय २८ रा. मोठा मारुती देशमुख गल्ली, परभणी), मोहम्मद मुक्तदीर उर्फ मुक्का मोहंमद अथर (वय ३१, रा. शाही मस्जिद, स्टेडियम रोड, परभणी) या तिघांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी विविध गुन्ह्यातील दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली.

या पथकाने संशयितांनी दाखविलेल्या वेगवेगळ्या ठिकाणावर जाऊन चोरीच्या २२ लाख रुपये किंमतीच्या एकूण ३० दुचाकी ताब्यात घेत जप्त केल्या. यात वजीराबाद-६, नांदेड ग्रामीण-१, शिवाजीनगर-३, भाग्यनगर-१, इतवारा-२, गंगाखेड-५, कदीम जालना-२, परतूर,जालना- १ तसेच अंबाजोगाई पोलीस ठाण्यातील एक याप्रमाणे २२ गुन्ह्यातील दुचाकी असल्याचे उघडकीस आले असून उर्वरित गुन्हे उघडकीस आणण्याची प्रक्रिया सुरु असल्याचे पोलिस निरीक्षक भंडरवार यांनी सांगितले.

शहरातील वाडेकर हॉस्पिटल, आधार हॉस्पिटल, चिखलवाडी, कॅंब्रिज शाळा, डॉक्टर लेन, बाफना शोरूम, नांदेड ग्रामीण, जिल्हा परिषद परिसर, किंग कलेक्शन, छत्रपति चौक, देगलूर नाका अशा विविध भागासह गंगाखेड, अंबेजोगाई, परतुर, जालना या ठिकाणावरून चोरट्यांनी दुचाकी चोरी केल्या असल्याचे तपासात समोर आले आहे. आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता एका गुन्ह्यात दोन दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. इतर गुन्ह्यांच्या तपासासाठी त्यांना वेगळ्याने न्यायालयासमोर हजर करावे लागणार आहे. वजिराबाद पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींकडून आणखी बरेच गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दै. पुण्यनगरी दि. 20/10/2022



SHARMA TRAVELS
दिवाळीनिमित्त विशेष सवलत.
दि.१९,२०,२१, २२ ऑक्टो.२२ पर्यंत
नांदेड - पुणे जाण्यासाठी
स्लीपर कोच : 300 रूपये
स्लीपर Non -A/C :350 रूपये
A/C स्लीपर: 400 रूपये
नांदेड-मुंबई फक्त : 700 रूपये.
संपर्क : नवीन पुलाजवळ जुना मोंढा, नांदेड.
02462-241530/ 247530/236530.

# वजिराबाद पोलिसांनी केल्या ३० दुचाकी जप्त

## २२ लाखांचा मुद्देमाल ताब्यात

**नांदेड / प्रतिनिधी**

वजिराबाद गुन्हे शोध पथकाने शहरातून चोरीला गेलेल्या दुचाकीच्या ठिकाणाचे सीसीटीव्ही फुटेज तपासून ३ आरोपींना ताब्यात घेतले आहेत. त्यांच्याकडून विविध कंपनीच्या २१ लाख ८० हजार रुपयांच्या ३० दुचाकी जप्त केल्या आहेत. या कारवाईमुळे शहरातील वजिराबाद, शिवाजीनगर, नांदेड ग्रामीण, भाग्यनगर, इतवारा पोलीस ठाण्यासह परभणी, जालना, गंगाखेड, अंबेजोगाई येथील २२ गुन्हे उघडकीस आले आहेत. आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे.



शहर व परिसरात दुचाकी चोरीच्या घटना वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पोलीस उपमहानिरीक्षक निसार तांबोळी, पोलीस अधीक्षक प्रमोद शेवाळे, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, निलेश मोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रसेन देशमुख यांनी दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश दिले होते. या अनुषंगाने वजिराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार यांनी गुन्हे शोध पथकास दुचाकी चोरीच्या ठिकाणांचे सीसी फुटेज तपासून शोध लावण्याचे आदेश दिले. वजिराबाद गुन्हे शोध पथकाचे प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार, अंमलदार दत्तराम जाधव, गजानन किडे, विजयकुमार नंदे, शरदचंद्र चावरे, संतोष बेलुरोड, व्यंकट गंगलुवार, रमेश सूर्यवंशी, अंकुश पवार यांनी गुन्हे उघडकीस आणण्यासाठी सर्व ठिकाणच्या सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करुन आरोपींचा शोध घेण्यासाठी तपास सुरु केला. मिळालेल्या माहितीच्या आधारे दुचाकी चोरटे परभणीतील असल्याची माहिती प्राप्त झाली. **(पान २ वर..)**

**(पान १ वरून)**

## वजिराबाद गुन्हे...

पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी परभणी येथे जाऊन सहाय्यक पोलीस अधीक्षक परभणी अभिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक खदीर शेख व पोकाँ नीलेश कांबळे यांना सोबत घेऊन शेख अरबाज ऊर्फ कोबरा शेख चाँद (२४, मजुरी रा. दर्गारोड, पारवा गेट परभणी ता.जि. परभणी), आरेज खान उर्फ आमेर पिता अयुब खान (२८, टेलर रा. मोठा मारोती, देशमुख गल्ली परभणी), मोहम्मद मुक्तदीर उर्फ मुक्का मोहम्मद अथर (३१,बेकार रा. शाहीमज्जीद, स्टेडियम मार्ग परभणी) यांना ताब्यात घेण्यात आले.

या तिघांचीही स्वतंत्र चौकशी केली असतात्यांनी वेगवेगळ्या ठिकाणांहून चोरीच्या २१ लाख ८० हजारांच्या ३० दुचाकी काढून दिल्या. या दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

त्यात पोलीस ठाणे वजिराबाद नांदेड येथील (६), पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण (१), पोलीस ठाणे शिवाजीनगर (३), पोलीस ठाणे भाग्यनगर (१), पोलीस ठाणे इतवारा (२), पोलीस ठाणे गंगाखेड जि. परभणी (५), पोलीस ठाणे कदीम गंज जालना (२), पोलीस ठाणे परतूर जि. जालना (१) व पोलीस ठाणे अंबेजोगाई शहर जि. बीड (१) असे एकूण २२ गुन्ह्यांशी कबुली या तिन्ही आरोपींनी दिली आहे. उर्वरित गुन्हे उघडकीस आणण्याची प्रक्रिया सुरु आहे. होंडा युनीकॉन, होंडा शाईन व पॅशन प्रो या दुचाकी प्रामुख्याने चोरण्यात आल्या.

बनावट चाबीचा वापर करून या चोऱ्या करीत असल्याची बाब समोर आली आहे. नांदेड जिल्हा पोलीस दलातर्फे चोरीचे सर्व गुन्हे उघडकीस आणण्या कामी नांदेड जिल्हा पोलीस दल प्रयत्नशील असून आगामी काळात दीपावली सण साजरा होणार असल्याने जनतेने आपली दुचाकी व इतर वाहने चोरीला जाऊ नयेत याच खबरदारी घ्यावी. केवळ दुचाकीच्या कुलुपावर अवलंबून न राहता अन्य लॉकही दुचाकींना लावावेत असे आवाहन पोलीस अधीक्षक प्रमोद शेवाळे यांनी केले. चोरीच्या ३० दुचाकी वजिराबाद पोलिसांनी जप्त केल्याबद्दल शेवाळे यांनी पोलीस ठाणेदार व सहकाऱ्यांचे कौतुक केले आहे.